# ग्रामालोकमधून लोककलाकार, साहित्यिकांना प्रोत्साहन

## पूर्णानंद च्यारी : पेडणेतील कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद, साहित्यावर चर्चा

**पेडणे, ता. १ (प्रतिनिधी):** मौखिक साहित्य ते अक्षर साहित्य यांच्यात सेतू उभारण्याचे काम ग्रामालोक कार्यक्रमातून साहित्य अकादमी देशभरात करत असून त्यातून ग्रामीण भागातील लोककलाकार व साहित्यिक यांना प्रोत्साहन लाभत आहे, असे प्रतिपादन साहित्यिक तथा साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. पूर्णानंद च्यारी यांनी केले..

ग्रामपंचायत तुये व कोकणी कलामाची पेडणेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रामालोक कार्यक्रमात च्यारी बोलत होते. यावेळी तुयेच्या सरपंच अनिता आनंद साळगावकर, उपसरपंच मनोहर पेडणेकर, पंच सुलक्षा नाईक आणि स्वीटी नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

पंच उदय मांद्रेकर यांनी स्वागत केले. साहित्य अकादमीच्या कोकणी सल्लागार मंडळाचे सदस्य कवी शशिकांत पुनाजी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रनिवेदन रशी परब यांनी केले. कोकणी कलामाची पेडणेचे अध्यक्ष प्रकाश तळवणेकर यांनी आभार मानले.




**तुये :** लोककला सादर केलेल्या पथकासोबत डॉ. पूर्णानंद च्यारी,. सोबत सरपंच अनिता आनंद साळगावकर, उपसरपंच मनोहर पेडणेकर, पंच सुलक्षा नाईक, स्वीटी नाईक, उदय मांद्रेकर, शशिकांत पुनाजी व प्रकाश तळवणेकर.

### विविध साहित्यिक कार्यक्रम

यावेळी संतोष महाले यांनी कथाकथन, प्रियांका परब यांनी लोकसाहित्य व लोक कला यावर विवेचन केले. ज्योकिम फर्नांडिस यांनी नाट्य सादरीकरण तर अद्वैत साळगावकर यांनी पेडणे कोकणी शैलीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. सायली आजगावकर यांनी काव्यवाचन केले. मैथिली च्यारी यांनी नमन सादर केले. अशोक नाईक यांच्या नेतृत्वाखाली रोमट सादर झाले. काजरेश्वर सेल्फ हेल्प ग्रुपने फुगडी तर मांगिरिश विद्यालय आरोबा व सरकारी प्राथमिक शाळा मधलावाडा, पार्से यांनी लोकनृत्य सादर केली.